# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.01.2025** **वारःशुक्रवार**

1. आठव्या वेतन आयोगाची स्थापना करायला केंद्र सरकारची मंजुरी
2. इस्रोच्या स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत अंतराळात दोन उपग्रह जोडण्याचा प्रयोग यशस्वी
3. मुदत संपल्यानं सहा जिल्हा परिषदा आणि 44 पंचायती समित्यांवर प्रशासक नेमण्याचा राज्य सरकारचा निर्णय
4. राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा आणि
5. विश्वचषक खो खो स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघ आपापल्या गटात अव्वल स्थानावर; उपांत्यपूर्व फेरीतील स्थानही निश्चित

**केंद्रीय मंत्रिमंडळ-वैष्णव**

केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. याच्या शिफारशी 2026 पासून लागू होतील. सातव्या वेतन आयोगाचा कालावधी पुढच्या वर्षी संपणार आहे. तोपर्यंत या वेतन आयोगाच्या शिफारसी प्राप्त होतील, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं. आयोगाचे अध्यक्ष आणि 2 सदस्यांची नेमणूक लवकरच होईल, असंही ते म्हणाले.....

श्रीहरीकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात तिसरं लाँच पॅड उभारायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. चंद्रावर मानव पाठवण्याच्या इस्रोच्या आगामी मोहिमांसाठी याचा वापर होईल.

**स्पेडेक्स**

इस्रोच्या महत्त्वाकांक्षी स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत अंतराळात दोन उपग्रह एकमेकांशी जोडण्याचं डॉकिंग काल यशस्वी झालं. या मोहिमेअंतर्गंत अवकाशात सोडलेल्या चेसर आणि टार्गेट या दोन उपग्रहांना इस्रोनं यशस्वीरित्या जोडलं. इस्रोच्या या यशामुळे अशा प्रकारचं तंत्रज्ञान असलेला भारत हा जगातला चौथा देश ठरला आहे. अंतराळ मोहिमांसाठी हे तंत्रज्ञान अतिशय महत्त्वाचं आहे. चंद्रयान 4 आणि भारतीय अंतराळ स्थानक उभारणीसारख्या भविष्यातील अनेक मोहिमांसाठी याचा इस्रोला मोठा उपयोग होणार आहे. इस्रोच्या या यशाबद्दल राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, आणि पंतप्रधानांनी शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे.

**राज्यसरकार निर्णय-मुंबई**

मुदत संपल्यानं राज्यातल्या सहा जिल्हा परिषदा आणि त्यांच्या अंतर्गत  येणाऱ्या 44 पंचायती समित्यांवर प्रशासक नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. या जिल्हा परिषदांमध्ये नागपूर, अकोला,

वाशिम, धुळे, नंदुरबार आणि पालघर यांचा समावेश आहे. या सहा जिल्हा परिषदांच्या अंतर्गत येणाऱ्या 44 पंचायत समित्यांची मुदतही संपल्याने प्रशासक नेमण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रशासक म्हणून काम पाहतील.

दरम्यान राज्य निवडणूक आयुक्त पदासाठी नावाची शिफारस करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना देण्यास काल झालेल्या राज्य मंत्री परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवा मोबाईलच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठीची ऑनलाईन प्रणाली विकसीत करावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह, कॅबिनेट आणि राज्य मंत्री यावेळी उपस्थित होते.

**<u>लाडकी बहीण</u>**

राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा पुढचा हप्ता 26 जानेवारीपर्यंत देण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. मंत्रालयात मंत्री परिषद बैठकीनंतर त्यांनी काल पत्रकारांशी संवाद साधला.

**<u>स्टार्टअप-मुख्यमंत्री</u>**

राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केली. राष्ट्रीय स्टार्टअप दिवसानिमित्तानं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सिडबी-म्हणजेच लघु उद्योग विकास बँकेकडून स्टार्ट अपसाठी 200 कोटी रुपये तर प्रत्येक प्रादेशिक विभागाला 30 कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले...

**<u>ज्योतिरादित्य शिंदे</u>**

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई बाई फुले हे आपलं आरध्य आहेत; आणि याच भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली; त्यामुळे महाराष्ट्राच्या मातीशी आपलं भावनिक नातं आहे; अशा शब्दात केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल आपल्या भावना व्यक्त केल्या. भारतीय जनता पार्टीच्या वतीनं संविधान गौरव अभियाना सन्मान सभा आयोजित करण्यात येत आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्रातील पहिली संविधान गौरव अभियान सन्मान सभा शिंदे यांच्या उपस्थितीत काल पुण्यात झाली. त्यावेळी ते बोलत होते. सावित्रीबाई फुले स्मारक परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, हेमंत रासने उपस्थित होते. यावेळी बोलताना ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले.....

**<u>संजय जाजू</u>**

देशाची समृद्ध परंपरा आणि वारसा जगभरात पोहोचवण्यात चित्रपट क्षेत्राचा मोठा वाटा आहे, असं प्रतिपादन केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये 10 व्या अजिंठा-वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ते काल बोलत होते. देशाच्या विविध भागात चित्रपट महोत्सव

भरवले जात आहेत; यातून चित्रपट, संगीत, नाटक आणि नृत्याविषयी लोकांना असलेली रुची दिसून येते असं जाजू म्हणाले.

**राज्यपाल-चंद्रपूर**

जागतिक हवामान बदल रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचं राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. चंद्रपूरमध्ये हवामान बदलासंदर्भातील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते काल बोलत होते. आमदार सुधीर मुनगंटीवार, जलपुरुष राजेंद्र सिंह, SNDT विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव आदि यावेळी उपस्थित होते.

**युवामहोत्सव-पालघर**

नवी दिल्लीत राष्ट्रीय युवा महोत्सवात झालेल्या लोकनृत्य स्पर्धेत वसईच्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या संघाचं प्रथम क्रमांकाचं पारितोषिक मिळवलं; या संघाचं काल वसईत लेझीम आणि ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आलं. या स्पर्धेत महाराष्ट्राचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या वर्तक महाविद्यालयाच्या संघानं 'दिवली' हे लोकनृत्य सादर केलं होतं.

**सैफ अली खान-मुंबई**

अभिनेता सैफ अली खान यांच्यावर काल पहाटे मुंबईतल्या घरी अज्ञात इसमानं चाकू हल्ला केला; त्यात त्यांना 6 ठिकाणी जखमा झाल्या होत्या. त्यानंतर लीलावती रुग्णालयात त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. यात डॉक्टरांनी मणक्यातून चाकूचा तुकडा बाहेर काढला. सैफ अली खान यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली असून अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी एका व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी 10 पथकांची नियुक्ती करण्यात केल्याची माहिती पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी दिली. दरम्यान, या प्रकरणानंतर विरोधकांनी राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेवरून सरकारवर टीका केली आहे. त्यावर, देशातल्या सर्व महानगरांमध्ये मुंबई हे सर्वात सुरक्षित असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

**विश्वचषक खोखो**

विश्वचषक खोखो स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या आणि महिलांच्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला असून आपापल्या गटात दोन्ही संघ अव्वल स्थानावर आहेत. नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या संघानं काल भूतानवर 71-32 असा विजय मिळवला. तर महिला संघानं मलेशियावर 100-20 अशी मात केली.

**हवामान**

राज्यात अनेक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ झाली आहे, येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**